अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने सावली व पोंभुर्णा येथे आदिवासी मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह सुरु होणार

सावली येथे नागरिकांना दिलेल्या आश्वासनाची 6 व्या दिवशीच पुर्तता

=====================================================

अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर जिल्हयातील सावली आणि पोंभुर्णा येथे अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींकरीता नविन शासकीय वसतिगृहे सुरु करण्यासाठी शासनाने मान्यता प्रदान केली आहे. राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाने दि. 8 मार्च 2019 रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत केला आहे. विशेष म्हणजे दि. 2 मार्च 2019 रोजी सावली येथे झालेल्या विविध विकासकामांच्या भुमिपुजन कार्यक्रमात 7 दिवसात अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींकरीता नविन शासकीय वसतिगृह सुरु करण्याचे आश्वासन अर्थमंत्र्यांनी दिले होते. यापुर्वीच हा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. चंद्रपूर जिल्हयातील सावली आणि पोंभुर्णा या आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये अनुसूचित जमातीच्या अर्थात आदिवासी मुलां-मुलींसाठी वसतिगृहे नसल्यामुळे अडचणींचा सामाना करावा लागत होतो. शालेय तसेच महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या आदिवासी विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. ग्रामीण तसेच दुर्गम भागातुन येणारे हे विद्यार्थी तालुक्याच्या ठिकाणी शिक्षणाला येतात. मात्र त्या ठिकाणी निवास, भोजन व शैक्षणिक खर्च परवडत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. सावली व पोंभुर्णा हे तालुके आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त दरडोई उत्पन्न कमी असलेले व मानव विकास निर्देशांकात मागे असलेले तालुके असल्याने या ठिकाणी शासकीय वसतिगृहे सुरु होत असल्याने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना तेथील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेणे सुलभ होणार आहे.

दि. 2 मार्च रोजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार सावली येथे विविध विकासकामांच्या भुमिपुजन सोहळयासाठी दौ-यावर गेले असता तेथील आदिवासी संघटना, लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्याकडे वसतिगृह सुरु करण्याची मागणी केली असता 7 दिवसात याबाबतचा शासण निर्णय निर्गमित करण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्या आश्वासनाची पुर्तता करण्यात आले आहे.

पोंभुर्णा येथे 75 विद्यार्थी क्षमतेचे मुलांचे 1 तालुका स्तरीय वसतिगृह तर 75 विद्यार्थीनी क्षमतेचे 1 तालुका स्तरीय वसतिगृह स्थापन करण्यात येणार आहे तसेच सावली येथे सुध्दा 75 विद्यार्थी क्षमतेचे मुलांचे 1 तालुका स्तरीय वसतिगृह तर 75 विद्यार्थीनी क्षमतेचे 1 तालुका स्तरीय वसतिगृह स्थापन करण्यात येणार आहे.